म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र.



IRBK-0116077

# संपदा

योगिनी जोगळेकर

१६०७७
१६८०७५
बा. वा.

'गुण' संग्राहक-माला : पुष्प ९ वें



# अक्षय संपदा

लेखिका
कु. योगिनी जोगळेकर

मूल्य : दीड रुपया

IRBK 0116077
IRBK-0116077

१९७५

प्रकाशक :
न. शं. कुलकर्णी,
जयन्त आणि कंपनी,
स. नं. ७२० चा २०,
नवी पेठ, पुणें ३०.

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

प्रथमावृत्ति : सन १९७५
दिनांक : २३ जून १९७५
वटपौर्णिमा : शके १८९७

मुद्रक :
न. शं. कुलकर्णी,
टीचर्स प्रिंटिंग प्रेस,
स. नं. ७२० चा २०,
नवी पेठ, पुणें ३०.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ........ नों. दि. ........
वि. ........

व्रजभाषिक लेखक योगेश छोटा ।
मावशी सांगते 'संपदा' लुटा ॥
कु. योगिनी जोगळेकर

# प्रकाशकाचा हेतु

## अक्षय संपदा

भारतीय संस्कृति ही उज्ज्वल आहे. संस्कृतीचा आविष्कार हा उत्तमोत्तम गुणांच्या द्वारें होत असतो. असे गुण दाखविणारें सुरस साहित्य प्रकाशित करणें, हाच आमचा हेतु. ह्या कथेंत निरपेक्ष राष्ट्रसेवा कोणीं केली व अक्षय संपदा कशी मिळविली तें ही कथा वाचा म्हणजेच कळेल.

सोमवार : वटपौर्णिमा : शके १८९७
दिनांक : २३ माहे जून सन १९७५

—प्रकाशक

वाचनालय शाखा.




खणाच्या परकराचा आच्याकोच्या घातलेली – अंगात माहेश्वरी खणाचीच चोळी ल्यायलेली एक परकरी पोर राम प्रहरी मेंढरं वळत होती. दिसण्यात नखरा नव्हता पण तोरा होता. चालण्यात लडिवाळ ठम्कारा होता.

भुरके केस भुरुभुरु उडत होते. चिमणे पाय तुरुतुरु चालत होते. मोठ्ठाले डोळे दूरवर भिरभिरत-होते. जसे ते सारी सृष्टी मावावी म्हणूनच मोठ्ठाले झाले होते. गोबरे गाल पळताना लालम्लाल दिसत होते. आभाळीच्या उषेलाही तो लालिमा प्यावेसे वाटत होते.

चेहऱ्याभोवती हास्याची किरणे फाकली होती. उगवतीच्या सहस्त्ररश्मीच्या मनात हेवा उत्पन्न करीत होती.

अंगावर सोन्यामोत्याचा साज नव्हता. भूमातेने चढवलेला मृत्तिकेचा गुलाल-बुक्का तेवढा होता. त्या लहान बालिकेला तोच शोभून दिसत होता; गळा मोत्याची माळ नव्हती; पण भाळी घर्मबिंदुची ओळ होती; तीच कशी साजिरी–गोजिरी दिसत होती.

वासरांमेंढरांनी माना मुरडून पाहिले. पाखरांनी ताना थांबवून पाहिले. अरुणाने रथ मुरडून पाहिले. अनिलाने शीळ मंदावून पाहिले. ना होती ती सरदार कन्या. ना होती ती राजकन्या. ती होती साधी धनगरकन्या – अहिल्या.

**अहिल्येच्या रूपात निसर्ग सांगत होता,' एक आरोग्याचा दागिना अंगी असला की बाकीचा सारा नट्टापट्टा सुना असला तरी चालतो. असेल जर उत्तम प्रकृती तर करायचेत काय हिरेमोती ? असेल जर सुदृढ बांधा तर पडेना का सोन्याचा वांधा!'**

मेंढरे चरणीला लावून अहिल्या आंब्याखालच्या तांबड मातीत बसली आणि तिने न्याहारी सोडली. दाताने कचदिशी कांदा फोडला. नाचणीच्या लाल लाल भाकरीचा तुकडा मोडला आणि मग रोजच्या संवयीप्रमाणे तो तुकडा तसाच हातात धरून ती उभी राहिली आणि पाय उंचावून सगळ्या मेंढरांनी घास

घेतला की नाही ते पाहू लागली. तो तिचं लाडकं मेंढरू– ‘बारकू’ गवताला न शिवता–बाटुकही न चघळता तसंच उभं असलेलं तिला दिसलं.

झालं ! भुकेली अहिल्या स्वतःची भूक विसरली. तहानेली अहिल्या स्वतःची तहान विसरली. दमलेली अहिल्या स्वतःचा विसावा विसरली. तिने हातातला तुकडा टाकला आणि धावत जाऊन स्वतःच्या पाठच्या भावंडाप्रमाणे दोन्ही हातात खमाटून बारक्याला तिने आंब्याखाली आणले.

बारक्याच्या तोंडाला काहीतरी झाले होते. त्याची जीभ सारखी लवलव करीत होती आणि तोंडातून लसालसा पाणी गळत होते–

“अय्याई ! माझा बारकू तो ! जिवाला कसनुसं होतंय राजाच्या. घास गिळवत न्हाई ? ”–

त्याला कुरवाळीत ती पुटपुटली. आणि मग तिने पुढ्यातली भाकरी पाण्यात मळून बारकूला भरवली.

सुखावलेला बारकू उड्या मारीत खिल्लारात मिसळला तेव्हा नुसताच कांदा चावून अहिल्याही उड्या मारीत त्याच्या-मागे धावली.

---

त्या कळपाला हातातल्या शिपटीने बळेच दटावीत ती पाणोठ्यावर निघाली तेव्हा माथ्यावरती वैशाखाचा सूर्य सणसणत होता. पायातळवटी कढत रेतीचा पसारा रणरणत होता.

तेवढ्यात खालच्या आळीची शिती घागर डोईवर घऊन माघारलेली अहिल्येला भेटली. शितीचे तोंड उन्हाच्या हबक्याने लालबुंद पडले होते आणि अनवाणी पायाच्या पोळण्याने 'स्ऽ हाऽय' असा उद्‌गार ती काढीत होती.

"हे ग काय शिते–पायतनाबिगर या फुफाटचात कशापायी आलीस ?"

"आयो बोलली – पुढच्या उरुसाला तुला पायतनं घेईन." डोळ्यात पाणी तरारले शितीच्या. तिच्या पाठीवरून हात फिरवून अहिल्या खाली वाकली. आपल्या वहाणा तिने काढल्या व स्वत:च्या हाताने खाली ओणावून शितीच्या पायात चढवल्या.

– "नगं नगं – ह्ये कशापाय ......" शिती संकोचली.

"परवाच थंडीतापाने घुमत व्हतीस त्ये पुन्हा बिमार पडायचाय व्हय ?"

तिला उत्तर द्यायला वेळही न देता अहिल्या पुढे सटकली.

* * *

झांजड पडल्यावर अहिल्या गावकुसाकडे वळली, तेव्हा रस्त्याच्या कडेच्या धुळीत एका म्हातारीने बसकण मारली होती. ती एकसारखा पाय झिझाडत होती आणि त्या पायातून रक्ताची धार ठिबकत होती.

म्हतारीच्या जवळ जाऊन अहिल्या प्रेमळपणे म्हणाली, "काय झालया आजी तुमच्या पायास्नी ?" "करट फुटलंया,

दगडाचा ढका लागूनशान्. अरं ऽ रामा ऽ ऽ ! " म्हातारी विव्हळली.

अहिल्येनें म्हातारीच्या पायावर रानतुळस चुरमडून लेपली आणि नेसूंचा धडोता काढून तिने ते करट बांधले.

तिच्या पाठीवर मोठ्या वात्सल्याने आपला सुरकुतला हात फिरवीत म्हातारी उद्गारली–

" माझा तुस्नी आशीर्वाद हाय ! राजाची रानी व्हशील नी झालीस तरी उतानी चालायाची न्हाईस तर समद्यास्नी प्वाटच्या लेकरापरमानं पोटाशी घ्येशील. "

गालातल्या गालात हसून अहिल्या पुढे सटकली. अशी ती बालपणीची अहिल्या !

* * *

**मोठ्यांचा मोठेपणा बालपणांतही आपल्या रंगछटा दाखवून जातो. बाळाचे पाय पाळण्यांत दिसतात असे म्हणतात.**

* * *

**अहिल्येचे औदार्य व सौहार्द्र म्हणजेच तिची उदारता आणि ऋजुता, बाळपणीच तिच्या देहात वस्तीला येऊन राहिली. भरीतभर म्हणून विनम्रताही त्रिवेणीसंगम करायला धावली, असं हे बाळपणांत लपलेलं मोठेपण.**

* * *

तिच्या आजाआजीला वाटे...' आपली अहिल्या! बोलून चालून धनगराची पोर. मेंढरं वळावी. चरणीला न्यावी. नाला, नदी ओलांडावी. घरधन्याला न्याहारी करावी. चंद्रमौळी खोपटचाची लक्ष्मी व्हावी. यापेक्षा अधिक उन्हपाऊस कसला डोकावणार आहे तिच्या आयुष्यात ? ...."

पण नाही! हिच्या ललाटाचं लिखित सहस्ररश्मीनं उजळलेलं, विद्युल्लतेने धवळलेले, असिलतेने पाजळलेले, असं निघालं. हिच्या भाळीचं भाग्य लक्ष्मी आपल्या पाची बोटांनी रेखून गेली. मल्हार-रावांनी आपल्या एकुलत्या एक खंडेरावासाठी या गरीबाच्या पोरीला गृहलक्ष्मी म्हणून घरात घेतली.

हळदीच्या अंगानं होळकरांच्या उंबरठ्यावर ती आली, मात्र

होळकरांच्या या गृहलक्ष्मीबरोबर
राज्यलक्ष्मीनेही आपले बस्तान ठोकले.

अतिथि असो – आमंत्रित असो – दरबारी
असो; या वृक्षाची छाया सर्वांवर शोभे.
या आईची माया सर्वांना लाभे.
सासऱ्याला वाटे–आल्यागेल्याची कामना
पुरविणारी कामधेनु आहे माझी अहिल्या.
पतीला वाटे–माझ्या मनची स्वरमाला
उमटवणारी रागिणी आहे माझी अहिल्या.

*    *    *

अशीच काही संवत्सरे गेली. सौख्याचे पिसारे उभवून दिवसाचे मयूर अहिल्येच्या द्वारी नर्तन करून गेले. सौभाग्याचे नूपूर घालून घटिकांचे किन्नर अहिल्येच्या द्वारी गायन करून गेले.

**पण सारेच दिवस सारखे नसतात !**
**येवढं विशाल आभाळ तरी पण**
**त्याच्यासुद्धा भाळी अभ्रे येतात.**

मग अहिल्येच्या भाळी ती आल्यास नीयतीवर कोण रागेजणार ?

* * *

सतराशे चौपन्नमधली गोष्ट. छत्रपतींच्या दौलतीचं रक्षण करण्यासाठी व मराठ्यांच्या मसनदीची मुजारत संभाळण्यासाठी मल्हारराव व खंडेराव तळहाती शीर घेऊन धारातीर्थी गेले होते. उत्तरेकडचा बंदोबस्त चालू होता. गनीमांचा पाडाव, टिपणं साधून चालला होता.

भरतपूरला वेढा पडला होता, अशा वेळी कुंभेरीच्या वेढ्यात भवानी मातेला, स्वातंत्र्याच्या नवरात्रीचा प्रसाद खंडेरावाच्या रुधिराचा अर्पण झाला. खंडेरावाचा जीवनसूर्य वीरांना तेजाचे दान देत देत अस्तंगत झाला. वीरपुत्राला वीराचं मरण आलं !

**स्वातंत्र्यलक्ष्मीला जित्या तेजाची**
**आरती आवडते. तिच्या भाळाला**
**वीरांच्या रक्ताचा टिळा हवा असतो.**

खंडेरावानं प्राणाची आहुती देऊन स्वातंत्र्यदेवीचे लळे पुरवले.

पण ... त्यामुळे वृद्ध मल्हारराव आणखी जराजर्जर झाला, आणि अजून पंचविशीच्या रेषेवर घुटमळणारी अहिल्याबाई एकदम प्रौढ झाली.

रवीमागोमाग दीप्तीही पश्चिम समुद्रात बुडी मारते· खंडेरावामागोमाग आपलीही जीवनज्योती मालवावी असे क्षणार्ध अहिल्येला वाटलं;

पण मल्हाररावांची पाणावलेली नजर–व्याकुळलेला स्वर, प्रजेची दीनवाणी गती–केविलवाणी स्थिति .. तिने जगायचे ठरविले.मायेच्या माणसांसाठी,मायेच्यादेशासाठी, तिने जगायचे ठरविले. तप लोटले. आणि अठराशे सहासष्टात मल्हाररावाचे-सासऱ्याचे - छत्रही निखळलं.

अहिल्याबाईच्या एकेका नातेवाईकाला तिच्यापासून हिसकावून घेण्याची काळाला–मृत्यूला खोडच जडली !

पोटी मालेराव नावाचा एक पुत्र निपजला; पण तो वेडा निघाला. लवकरच कालवश झाला ! मुक्ताबाई नावाची लेक झाली. लगीन होऊन सासरी गेली; पण अकाली निवर्तलेला जामात फणसे याजबरोबर तीही सती गेली !

अशा तऱ्हेने अहिल्याबाई नि:संतान झाली. निपुत्रिका झाली!

पती – सासरा – पुत्र – गमावला !<br>
कन्येसह – जामात पण दुरावला! !

पण हिच्या आईपणाच्या मर्यादा शोकाने आखडल्या नाहीत तर रुंदावल्या. स्वतःच्या डोळ्यातल्या पाण्यापेक्षा इतरांच्या डोळ्यातल्या पाण्याने ती कळवळली ! प्रत्येक भारतीयच तिचे मूल झाला. त्याचे सुख-दुःख ते हिचे सुख-दुःख झाले.

शत्रूंच्या स्वाऱ्यांमुळे आणि मोगल अंमलदारांच्या गैरमर्जी-मुळे काही देवस्थाने उध्वस्त झाली होती तर काही तीर्थस्थाने त्रस्थ झाली होती. अहिल्येची कृपादृष्टी या सर्वांवर दानाची वृष्टी करून गेली.

घृष्णेश्वर-औंढ्या नागनाथ-परळी वैजनाथ-काशी विश्वे-श्वर आदि बारा ज्योतिर्लिंगांना तिने दिलेल्या भेटी दिवाबत्ती-बेलपत्ती - धर्मशाळा ; पाणपोया - वृक्षछाया यांपैकी कुठल्यातरी रूपात आजही उभ्या आहेत.

अयोध्या - मथुरा- माया- काशी- कांची- अवंतिका- द्वारावती इ. सप्तपुरी व हिंदुस्थानच्या चार दिशांचे दिग्पाल असलेली चारी धामे इ. ठिकाणी तिने केलेल्या मंदिरांचा जीर्णोद्धार आणि भक्तांचे हाल वाचवण्यासाठी तीर्थांच्या जागी बांधलेले प्रशस्त व दणकट घाट – अहिल्याबाईच्या दानशूरपणाचा थाटमाट दाखवीत आजही उभे आहेत.

स्वतः शैव असूनही वैष्णव-महानुभाव-नाथपंथी-वारकरी-पंथी-रामदासपंथी यांनाही तिने उदार आश्रय दिला. इतकेच नव्हे तर. स्वधर्मीयांबरोबरच परधर्मीयांशीही तिचे वागणे भगिनीभावाचे म्हणजेच सहिष्णु वृत्तीचे होते.

**थोरांची धर्मभावना स्वतःच्या जाती-पुरती मर्यादित रहात नसते तर अखील मानवजातीच्या कल्याणातच धर्म मानीत असते ! सत्-कर्म हाच सत्-धर्म !**

ना पुत्र–ना पति–ना श्वशुर !

पण ती तेजाची ज्वाला फडफडली नाही. ती शांतीची माला कोमेजली नाही. राज्याची धुरा तिने सर्वस्वी एकटीच्या शिरावर घेतली. भर्त्याच्या पश्चात अंधेऱ्या कोपऱ्यात बसल्यास राष्ट्राच्या भवितव्यातहि अंधेर माजेल हे तिने ओळखिले.

दरबारात बसून ती कारभार सांभाळू लागली. पोटच्या पोराप्रमाणे प्रजेला प्रतिपाळू लागली.

हिचे पाऊल पडले त्या त्या उजाड जागांवर धर्मशाळा वसल्या. हिचे डोळे जडले त्या त्या मुरमाडातून विहिरी पाझरल्या. हिचे अश्व चढले त्या त्या ओसाड नदीतटांवर पायऱ्या चढल्या. हिच्या कृपाछत्राखाली सर्वांना घास मिळे. सर्वांची प्यास पळे, सर्वांचा निर्वास गळे.

**गौतमाच्या अहिल्येचे शिळारूप श्रीरामांनी बदलून टाकले. तिला पुन्हा नावारूपास आणले. तर होळकरांच्या अहिल्येने प्रत्यक्ष शिळांनाच नावारूपास आणले. हिची दिव्य नजर पडल्या-वर अनेक दगड चिरंजीव झाले – घाट होऊन जनसेवेचे अखंड व्रत आपल्या उद्धारकर्तीबरोबर**

त्यांनीही घेतले. आपले फत्तराचे सामान्य जीणेही सार्थकी लावले. सन्मान्य केले. अजूनही गंगा-गोदा-नर्मदा-आदी अनेक लोक-मातांच्या कुशीत असे अनेक घाट वाऱ्याची बासरी करून 'अहिल्या-स्तोत्र' आळवतात. श्रीरामांनी उद्धारलेल्या अहिल्येचे नाव धारण केल्यावर पूर्वीचे ऋण फेडण्यासाठी तर दगडाधोंड्यांचा उद्धार या अहिल्येने आमरण केला नसेल ना? काही असो–

दिव्यत्वाच्या स्पर्शाने पददलितांचे
जिणे नेहमीच उद्धरून जात असते.

* * *

एकदा घरच्या दौलतीला खिंडारे पाडणाऱ्या राघोबाची काकदृष्टी हिच्या राज्याकडे वळली. राघोबाला वाटले मल्हार-रावाच्या जातिवंत तालमीत तयार झालेली ही अहिल्याबाई काही आपल्या टाचाखालचे मांजर होणार नाही. त्यापेक्षा आपल्याच पागेत तयार झालेले एखादे तट्टू निपुत्रिकेला दत्तक घ्यावयास लावावे, म्हणजे विनायासे इंदूरचे लगाम घरबसल्या खेचता येतील आपल्याला. आणि सैन्यानिशी तिच्याकडे येऊन त्याने आपला मानस तिला कळवला.

चार तपे दौलतीतले चढउतार पाहिलेली अहिल्याबाई– मुत्सद्देगिरीचा व शौर्याचा पिढीजात साज ल्यायलेली अहिल्या-बाई घाबरली नाही, डगमगली नाही.

वादळाने होडी उलटते,
टेकडी उलटत नाही.

तिने राघोबादादास साफ निरोप धाडला—

" अंबाबाईची आण ! छत्रपतींच्या दौलतीची सेवा इमाने इतबारे करीत आहे, करीनही ! मात्र माझ्या घरच्या उठाठेवी लोकांनी करू नयेत. माझी रयत मला पोटच्या पोरासारखी. तेव्हा दत्तविधानाने एकाचीच माता बनण्यापेक्षा सर्वांची माता होण्याचं भाग्य पृथ्वीपरीस मोठं ! आपण मातब्बर पेशवे.

इतउप्पर अश्व पिटाळले तर माझ्या स्त्रियांच्या पलटणी होळकरी पाणी दाखवतील, हे श्रीमंतांनी खूप समजून असावे. बहोत काय लिहावे ? माझी अबलेची जात. पराजित झाल्यास आश्चर्याची गोष्ट नोहेच. उलट होऊन पलट खायची वेळ इतरांवर आली तर मात्र दादासाहेब..."

—राघोभरारी भरारी न
घेताच माघारला ! !

* * *

बाईची आणि भुईची जात धोपटण्यासाठीच जन्माला आलेली असते, असा पुष्कळांचा गैर-समज असतो. या उलट माता व भूमाता अनेक चांगल्या गोष्टींची जन्मदात्री असते, भर्ती असते. म्हणूनच स्वतःच्या चुडा भंगला तरी महेश्वर नगरीचा चुडा अभंग राखायचे व्रत तिने सोडले

**नाही. भांडीधुणी करणाऱ्या स्त्रियांच्या पण राणीने पलटणी तयार केल्या. पुरुषांची मौज ठरलेल्या अबलाच सबला बनवून त्यांची फौज तयार केली.**

राघोभरारीच्या रूपात साऱ्या महाराष्ट्रालाच या महान् तेजस्विनीने हादरा दिला. मातब्बरांची टुरटूर बंद झाल्यावर शेळपटांची कुरकूर कशी चालू रहाणार? राज्यात सर्वत्र आबादीआबाद झाले. पोरथोर सुखाने घास खाऊ लागले. अहिल्या राणीला दुवा देऊ लागले.

प्रजा सुखी तर राजा सुखी, हे तत्व जगाला अहिल्येने तोंडाने नव्हे तर आचरणाने शिकविले.

**अहिल्याबाईंच्या ठिकाणी वीरवृत्ती होती, तशीच राज्यकर्तीला साजेसी दूरदृष्टीही होती.**

म्हणूनच जामघाटच्या पठारावर वाटसरू आणि यात्रेकरू यांची वाटमारी करून लुटणाऱ्या दरोडेखोरांचा तिने आगळाच बंदोबस्त केला.

**त्या गुंडांना तलवारीच्या बळावर न जिंकता प्रेमाच्या बळावर जिंकले. दारिद्र्य हे त्यांच्या गुन्हेगारीच्या बुडाशी असलेले कारण अचूक हेरले.**

वन्य जमातींना एकत्र केले. त्या सर्वांच्या उदरनिर्वाहासाठी म्हणून जमिनी दिल्या. भूदान केले.

त्या भागातील बंदोबस्तासाठी 'भिलकवडी' कर वसुलीची परवानगीही दिली. दरोडेखोरांनी जुने धंदे सोडले. त्यांच्या पाशवी वृत्तीने अहिल्येच्या दैवी वृत्तीपुढे हार खाल्ली !

म्हणूनच ती रयतेची राणी न रहाता
माता बनली – देवता झाली !

पण अहिल्याबाई मानाने वाढली तरी अभिमानाने पिडली नाही. स्वत:चे हात गगनाला टेकले–आभाळाला भिडले म्हणून शेजाऱ्यापाजाऱ्यांना मदतीचा हात द्यायला ती विसरली नाही.

छोटयापासून मोठयापर्यंत कुणाचीही अडवणूक झाली तर सोडवणूक करायला हिच्या अश्वशाळेतले वारू बाहेर पडत– हिच्या खजिन्यातले पैसे बाहेर पडत. महादजी शिंदा–मराठी साम्राज्याचा उत्तरेकडचा दिग्पाल–गनिमांचा दरोबस्त बंदोबस्त ठेवता - ठेवता खजिना अपुरा पडायची वेळ आली त्याची. अशा वेळी अहिल्याबाईंच्या भांडारातूनच तीन लाख रुपये धाविन्नले व दसलाखांचे काम करून गेले.

संपदा वा गुणसंपदा
जगासाठीच असतात.

* * *

व अशा तऱ्हेने राजकारणपटुत्व, शुचित्व, दातृत्व, कर्तृत्व – इंद्रधनुष्प्रमाणे अनेक लोभनीय गुणांच्या रंगशलाका अहिल्याबाईत सामावल्या. कन्याकुमारी पासून हिमाचलापर्यंत तिच्या व्यक्ति-

**रेखेचे आलेख उमटले. पदातीपासून रथारूढांपर्यंत तिच्या गुणांचे संकीर्तन होऊ लागले. वायूचे जासूद निघाले, दशदिशांनी कान टवकारले, चांदण्यांनी मुरडून बघितले, चंद्रसूर्यांनी थबकून ऐकले.**

*   *   *

– मग वाराणशीच्या त्या विद्वान ब्राह्मणाला या वंदनीया मानिनीला मानवंदना द्यावीशी वाटल्यास त्यात काय नवल होते ? तो इंदूरला आला, त्याला वाटले अहिल्याबाईंच्या व्यक्तित्वात येवढा गुणसमुद्र हेलावतो आहे,त्यातल्या चार लाटा आपल्या लेखणीच्या टोकावर नाचवाव्यात आणि लगोलग त्याने तिच्या गुणसंकीर्तनात्मक एक अभिजात ग्रंथ लिहिला.

चरित्रनायिकेच्या आठवणींची गोणी त्याला बाजारातून विकत आणावी लागली नाही. वीतभर गुणदर्शनाची हातभर धलपीही काढावी लागली नाही.

**प्रभाकराचा रथ नभोमंडलातून जायला लागला की त्याची दीप्ती भूपृष्ठावर नोंदली जाते. थोरांचा जीवनरथ विश्वतळावरून जायला लागला की त्याची कीर्ती माणसांच्या हृदयफलकावर नोंदवली जाते.**

त्या पंडिताच्या हृत्पटलावर अहिल्याबाईंची जीवनयोग्यता अशीच कोरली गेली. शब्दातून त्याने ती समूर्त केली आणि तो महान ग्रंथ घेऊन तो अहिल्याबाईंच्या दरबारी आला.

गुणग्राहक अहिल्याबाई! तिने त्या कलमबहाद्दराचा सत्कार केला. त्यानेही मानाचा मुजरा करून भर दरबारात तो गौरवग्रंथ सरदारांसमोर वाचून दाखविला. त्याची सार्थ गुणग्राहकता पाहून दरबारी मंडळी खूष होऊन गेली.

" वा रे अलंकारपटुत्व आणि अर्थगौरव. " एकाने अंगावरचा शेला लेखकाच्या अंगावर घातला.

" आईसाहेबांच्या अबोल कृत्यांना अशी वाचा कुणीतरी फोडावयास हवीच होती." दुसऱ्याने जरतारी पागोटे बहाल केले. " या गंगामाईचा गौरव करणारा दुसरा जगन्नाथच अवतरला म्हणावयाचा." कुठुनसा मोत्यांचा शिरपेच त्याच्या अंगावर आला. " महाभारताची पारायणे होतात तशी आम्ही इंदूरकरांनी या ग्रंथाची पारायणे करायला हवी." कंठा घालता-घालता आणखी एक सरदार म्हणाले.

त्या गौरवाचा साभार स्वीकार करून रेशमी वस्त्रात गुंडाळलेला तो ग्रंथ त्याने अहिल्याबाईसमोर ठेवला. " आई-साहेब ! लेकराची सेवा रुजू व्हावी." तो नतमस्तकाने व नम्र वाणीने म्हणाला.

त्या ग्रंथाला स्पर्श करून अहिल्याबाईंनी तो ठेवून घेतला. आणि ती म्हणाली—

" बेटा, दिवसेदिवस तुझ्या लेखनाची चंद्रकला वर्धमान होवो. "

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ९८०७८ नों. दि. २१.७.७५
वि. ८१.९१



पालखी देऊन तिने त्याचा गौरव केला, तिने त्याच्या लेखनपद्धतीबद्दल पुन: पुन्हा गौरवपर उद्गार काढले; परंतु त्यातल्या आशयासंबंधी मात्र चकार शब्दही काढला नाही.

**सत्काराचा नुसता हारतुरा लाभला तरी मोठमोठे हुरळून जातात, मग सत्काराचा ग्रंथ लाभल्यावर अस्मान ठेंगणे का होणार नाही ?**

अहिल्याबाईलाही अस्मान ठेंगणे व्हावयास हवे होते, पण नाही !

**अलौकिकांचे चरण सामान्यांची पायवाट चोखाळत नसतात !**

त्या ग्रंथाच्या वाचनानंतरही अहिल्याबाईचा मनोसागर शांतच राहिला.

ती हलकेच उठली. तो ग्रंथ घेऊन अश्वारूढ झाली. कुणाशी कुणाशीही न बोलता ! कुणालाही न सांगता ! तरीपण बाकीच्या लोकांना रहावेना. तिचा मागोवा घेत कारभारी मंत्री, इतर दरबारी मातबरही निघाले. शहराच्या पाणोठ्यावर पोचल्यावर अहिल्याबाई थबकली. आपले करचरण धुवून तिने जलवंतीला अर्घ्यप्रदान केले. नंतर हातात तो ग्रंथ घेऊन ती कमरेएवढ्या जलाशयात उतरली.

तिने आपले मस्तक त्या ग्रंथावर टेकले आणि ती पुटपुटली,

" हे ग्रंथराजा–सारस्वताचा उत्कट आविष्कार म्हणून तुला शतदा वंदना असो; परंतु ज्या विषयावर तुझे केंद्रीकरण झाले आहे, त्या अहिल्येचे एवढे स्तवन व्हावे अशी तिची लायकी नाही ! खरंच लायकी नाही ! ! "

## पूर्णत्वास पावलेल्यांचे स्मारक व्हावे, अपूर्णत्वाचे नव्हे !

मी अजून अपूर्ण आहे. कुणी सांगावं – तू माझ्याजवळ राहिलास तर त्या स्तुतीनं मी चढून जाईन.

कुणा निराधाराला आधार देण्यासाठी मग माझा हात वर होणार नाही. कुणा दीनदुबळ्याला पहाण्यासाठी मग माझा डोळा वर होणार नाही. कुणा थकल्याभागल्याच्या हाकेला 'ओ' देण्यासाठी मग माझी जीभ पुढे रेटणार नाही. कुणा लुळ्यापांगळ्याकडे धाव घेण्यासाठी मग माझे पाऊल पुढे पडणार नाही. आणि – आणि– अशा तऱ्हेनं माझं अंगीकृत कार्य निरुद्ध होऊन जाईल !

तसे होऊ नये म्हणून–केवळ तसं होऊ नये म्हणून . . . हे ग्रंथराजा-हे ग्रंथराजा-तुला मोठ्या आनंदाने जलवंतीला समर्पण करीत आहे. "

– एक मोठी लाट आली व ती ग्रंथ संपदा वाहून गेली; परंतू संवत्सरांच्या कितीतरी लाटा कालसागरावर येऊन गेल्या; पण अहिल्याबाईंची कीर्तीसंपदा जनहृदयींच्या तिजोरीत आजही सुरक्षित आहे ! अक्षय आहे ! !

आजही इंदूरच्या मातीला वंदन करून चरण लावलात – महेश्वरच्या वाऱ्याला मुजरा करून कान लावलात – क्षिप्रेचे तीर्थ प्राशून तिचा सूर ऐकलात – तर तोच ग्रंथराज धीरगंभीर रागिणीत अहिल्यास्तोत्र तुम्हालाही सुनवील –

जैशी गौतमाची अहिल्यापुराणी ।
तैशीच खंडेरावाची अहिल्याराणी ।
प्रातःकाली वंदन करोनी ।
पंचकन्या संबोधावी ।। १ ।।

धैर्य, शौर्य, औदार्य पाहून ।
चातुर्य, सौहार्द्र आले धांवून ।
विनम्रता भगिनी सवे घेऊन ।
महेश्वरी पातले ।। २ ।।

वैधव्य बिकट तरी न खचली ।
राज्य शकट ओढाया वाचली ।
निपुत्रिका असोन झाली माउली ।
अवघ्या प्रजाजनांची ।। ३ ।।

कीर्ती–संपत्ती–सरस्वती संगमात ।
स्नाना उतरले बहोत तृषार्त ।
तुम्ही–आम्हीही लावून शर्यत ।
मनसोक्त डुंबू या ॥ ४ ॥



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ९६०७८ नों. दि ९६/७/८७
वि. ४/१९१ ... ... ........ .......

IRBK-0116077

IRBK-0116077